महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

जा.क्र. :औसंवि/ब/ककनिस/५७वी बैठक/४८७४

दिनांक : १२/०२/२०१४

# परिपत्रक

विषय : म.रा.वि.मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५७ व्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय.

***********

सद्यस्थितीत, म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीतर्फे परिपत्रक क्र. ६१००, दि. ३/३/२००४ नुसार कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना Angioplasty / Angiography साठी रु. २०,०००/- व ४ प्रमुख आजारांकरिता १) मेंदूच्या गाठीची शस्त्रक्रिया (Brain Tumor Surgery) २) कर्करोग (Cancer) ३) गंभीर अस्थीरोग शस्त्रक्रिया (Major Orthopedic Surgery) ४) हृदय शस्त्रक्रिया (Replacement of Heart Valve / Bypass Surgery / Open Heart Surgery) या आजारांच्या उपचार / शस्त्रक्रियेसाठी रु. ४०,०००/- (रु. चाळीस हजार मात्र) म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीतून आर्थिक मदत दिली जाते.

दि. १८/१२/२०१३ रोजी म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीची ५७ वी बैठक प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

१) म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५७ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांनुसार **उपरोक्त ०४ प्रमुख आजारांपैकी अनु. क्र. ४ वरील हृदय शस्त्रक्रिया** ((Replacement of Heart Valve / Bypass Surgery / Open Heart Surgery) या आजारासोबत हृदय विकार शस्त्रक्रियेशी संलग्न आजार **Angioplasty** करिता **येणाऱ्या खर्चाबाबत** वैद्यकीय सल्लागार यांचा अभिप्राय घेऊन, **सदर आजार हा हृदय शस्त्रक्रियेशी संबंधीत असल्याने त्याचा समावेश ०४ प्रमुख आजारांमध्ये घेण्यास व तशी दुरुस्ती करण्यास** आणि त्यानुषगाने प्राप्त झालेल्या आर्थिक प्रस्तावास **मंजूरी देण्याबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला आहे. सबब, म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीचे परिपत्रक क्र. ६१००, दि. ३/३/२००४ मधील अनुक्रमांक ०६ वरील आजार Angioplasty / Angiography ऐवजी फक्त Angiography असे समजण्यात यावे** व Angioplasty या आजाराचा ०४ प्रमुख आजारांमध्ये समावेश केला असल्याने, सदर आजारासाठी **म.रा.वि.मं.क.क.निधीमधून रु. ४०,०००/- तसेच कंपनीकडून रु. २०,०००/- अशी एकूण रु. ६०,०००/- किंवा वैद्यकीय देयकांची एकूण रक्कम यापैकी जी कमी असेल त्या रक्कमे इतकी वैद्यकीय आर्थिक मदत केली जाईल.**

२) विद्यमान कार्यपध्दतीनुसार कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना म.रा.वि.मं.क.क.निधीमधून देण्यात येणाऱ्या वैद्यकीय आर्थिक मदतीबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत कोणतीही कालमर्यादा निश्चित नसल्याने, कितीही जुने प्रस्ताव समितीकडे प्राप्त होत होते. **म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५७ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांनुसार कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांस रुग्णालयातून डिस्चार्ज**

**झाल्यापासून ०१ वर्षाच्या आत वैद्यकीय आर्थिक मदतीचा प्रस्ताव सादर करणे संबंधीत कर्मचाऱ्यांस** बंधनकारक राहील असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

वरीलप्रमाणे सुधारीत तरतुदींच्या अमलबजावणीचा निर्णय दि. १७/०८/२०१३ पासून अमलात येईल. सदर परिपत्रकास विस्तृत प्रसिध्दी द्यावी.

सरद परिपत्रक महावितरण कंपनीच्या INTRANET - RAPDRP- Infoportal या संकेतस्थळावर Circular -Industrial Relations Department Circular येथे प्रसिध्द करण्यात आले आहे.

किशोर पवार

(किशोर पवार)

सदस्य / सचिव, म.रा.वि.मं. क.कं.नि.स.तथा

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रत सविनय सादर :

१) संचालक (वित्त), म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.मर्या., प्रकाशगंगा, वांद्रे (पूर्व), मुंबई.

२) ~~मुख्य महाव्यवस्थापक (वित्त), महावितरण.~~

३) कार्यकारी संचालक (मासं), महावितरण / महानिर्मिती / महापारेषण.

प्रत सस्नेह :

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती / महापारेषण.

- आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या कंपनी अंतर्गत उपरोक्त परिपत्रक प्रसारीत करण्याची कार्यवाही आपल्या स्तरावर करावी.

प्रत :

महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.